निविदा करारपत्रातील कामातील उणीवांच्या दुरुस्तीचा कालावधी (Defect Liability Period) निश्चित करणे.

# महाराष्ट्र शासन

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१५१/इमारती-२,**

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

दिनांक : १४ जानेवारी, २०१९

<u>वाचा</u> - सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीएटी-१०८७/सीआर-९४/इमारती-२, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक : १४ जून, १९८९

<u>प्रस्तावना :-</u>

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये करण्यात येणाऱ्या रस्ते, पूल, इमारतींच्या मूळ तसेच दुरुस्तीच्या विविध बांधकामांसाठी संदर्भिय परिपत्रकाव्दारे सन १९८९ मध्ये दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) निर्धारीत करण्यात आला असून त्यानंतर त्यामध्ये सुधारणा करण्यात आलेल्या नाहीत. सन १९८९ नंतर गेल्या तीस वर्षाच्या कालावधीत बांधकाम साहित्याचे प्रकार तसेच बांधकामाच्या तंत्रज्ञानामध्ये मोठया प्रमाणात आमुलाग्र बदल झाले आहेत, तसेच बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचा दर्जा व विविधतेत मोठया प्रमाणावर बदल होत आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये सर्वसाधारणपणे भारतीय रस्ते महासभा यांची मानके व रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या विनिर्देशानुसार रस्ते व पुलांची बांधकामे करण्यात येतात. रस्ते व पूल यांची बांधकामे करणारी रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाने त्यांचे बांधकामांसाठी दोष दायित्व कालावधी नव्याने निर्धारीत केले आहेत.

वाहतुक क्षेत्रात होत असणाऱ्या प्रचंड वाहतुकीची वाढ व त्यानुसार बदलत्या बांधकाम क्षेत्रातील कार्यपध्दती यांचा विचार करता बांधकाम खात्रीने दोषरहित होणे व टिकाऊ होणे व याद्दष्टीने करारनाम्यातील दोष दायित्व / उणीवांच्या दुरुस्तीचा कालावधी (Defect Liability Period) सुधारीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये करण्यात येणाऱ्या रस्ते, पूल, इमारतींच्या मूळ तसेच दुरुस्तीच्या विविध बांधकामांसाठी खालीलप्रमाणे दोष दायित्व कालावधी (Defect Liability Period) निर्धारीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

| **अ.क्र.** | **बांधकामाचा प्रकार** | **प्रस्तावित दोष दायित्व कालावधी** |
|---|---|---|
| | **अ) इमारती** | |
| १. | मूळ बांधकामे | |
| | १.१) आर.सी.सी. फ्रेमचे बांधकाम | १० वर्षे |
| | १.२) लोड बेअरींगचे बांधकाम | १० वर्षे |
| | १.३) जल प्रतिबंधक उपाय योजना | ७ वर्षे |
| २. | दुरुस्ती | |
| | २.१) विविक्षित / भांडवली स्वरुपाची दुरुस्ती (SDR/CTR) | ५ वर्षे |
| | २.२) विशेष दुरुस्ती (Special Repairs) | २ वर्षे |
| | २.३) किरकोळ दुरुस्ती (Current Repairs ) | १ वर्षे |
| | **ब) रस्ते** | |
| १. | डांबरीकरण / Flexible Pavement | |
| | १.१) संकल्पनानुसार पूर्ण तरतूद करुन बांधकाम | ५ वर्षे |
| | १.२) मजबूतीकरण / पूर्ण लांबीमध्ये किमान दोन थर - MPM/ BM | ३ वर्षे |
| | १.३) DBM चा १ थर व त्यावर B.C. / O.G.C. चा थर किंवा संकल्पनानुसार पहिल्या टप्प्याचे बांधकाम (Stage Construction) | ३ वर्षे |
| | १.४) फक्त डांबरी नुतनीकरण - पूर्ण लांबीमध्ये एक थर | २ वर्षे |
| | १.५) भागाभागात patches of MPM/ BM/DBM चा १ थर व त्यावर पूर्ण लांबीत B.C. / O.G.C. चा थर | २ वर्षे |

| | | |
|---|---|---|
| २. | कॉन्क्रीटीकरण / Rigid Pavement | |
| | २.१) संकल्पनानुसार ३० से.मी. किंवा त्यापेक्षा जास्त जाडी | १० वर्षे |
| | २.२) संकल्पन न करता केलेल्या पायवाटा, गावांतर्गत रस्ते व अन्य रस्ते | ३ वर्षे |
| | २.३) कॉन्क्रीट पेव्हर ब्लॉक वापरुन केलेली कामे | ५ वर्षे |
| ३. | रस्ते खडीकरण | १ वर्षे |
| ४. | रस्ते किरकोळ दुरुस्ती | १ वर्षे |
| | ४.१) डांबर मिश्रित खडीने खड्डे भरणे, चुना गेरु रंगविणे. | (डिसेंबर ते जुन) नजिकच्या पावसाळया पर्यंत |
| | ४.२) आय.आर.सी. मानकानुसार बसविलेले फलक | ५ वर्षे |
| | ४.३) मार्गिका दर्शक व इतर थर्मोप्लास्टीक पेंट | ३ वर्षे |
| **क) पूल व मोऱ्या** | | |
| १. | मूळ बांधकाम | |
| | १.१) पूलाचे बांधकाम | २० वर्षे |
| | १.२) स्लॅब ड्रेन व पाईप मोऱ्या | १० वर्षे |
| | १.३) कॉन्क्रीटच्या बांधीव गटारी Built Up Gutter | १० वर्षे |
| २. | दुरुस्ती | |
| | २.१) विशेष दुरुस्ती - बेअरींग बदलणे, प्रसरण सांधे बदलणे, पॅरापेट वॉलची पुनर्बांधणी करणे, पाईप रेलींग बसविणे, पिअर/ अबटमेंटला जॅकेटींग करणे, इत्यादी. | ५ वर्षे |
| | २.२) पुलावरील वेअरींग कोर्स | ५ वर्षे |
| | २.३) पुलाचे इपॉक्सी पेंटने पेंटींग करणे व तत्सम दुरुस्ती करणे | ३ वर्षे |

पूर्ण करण्यात आलेल्या बांधकामांची दोष दायित्व कालावधीत वर्षातून किमान दोनदा (सर्वसाधारणपणे पावसाळयापूर्वी व पावसाळयानंतर) पाहणी करण्याची जबाबदारी संबंधित उप विभागीय अभियंता यांची राहील.

दोष दायित्व कालावधीत कामामधील उणीवा बारकाईने तपासाव्यात. जर आढळलेल्या उणीवा ह्या दुरुस्ती करण्याच्या आवाक्याबाहेर असल्यास / पूर्ण कामच नव्याने करावयाची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे पुन्हा बांधकाम करण्यासाठी कंत्राटदारास सूचना देऊन तीन महिन्यामध्ये काम नव्याने करुन घेण्यात यावे. या बाबतीत काही वाद उद्भवल्यास मुख्य अभियंता यांना अहवाल सादर करुन त्यांचेकडून निर्णय घेण्यात यावा. मुख्य अभियंता यांचा निर्णय हा अंतिम व कंत्राटदारास बंधनकारक राहील अशा स्वरुपाची भर निविदेत नमुद करावी.

उपविभागीय अभियंता यांनी दोष दायित्व कालावधीमध्ये वरीलप्रमाणे पाहणी केल्यानंतर कामामध्ये दोष / उणीवा आढळल्यास कंत्राटदाराकडून त्या त्या वेळी आवश्यक दुरुस्ती / पुनर्बांधणी करुन घेण्यात यावी. दोष दायित्व कालावधी संपण्याच्या किमान तीन महिने आधी कार्यकारी अभियंता व उप अभियंता यांनी एकत्रितपणे कामाची पाहणी करुन त्या अनुषंगाने कंत्राटदाराने केलेल्या दुरुस्तीबाबतचा आढावा घ्यावा ६०० मीटरपेक्षा जास्त लांबीच्या पुलांची व १००० स्क्वे.फु.मी. जोते क्षेत्रफळापेक्षा जास्त जोते क्षेत्रफळ असलेल्या इमारतीचे दुरुस्ती कामांचे पूर्ननिरीक्षण अधीक्षक अभियंता यांनी दर सहामाही करावे.

२. निविदेमधील प्रपत्रामध्ये विविध प्रकारच्या कामांसाठी उणीवा दुरुस्तींचा कालावधी उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ठेवण्यात यावा. तसेच निविदा प्रपत्रामध्ये दोष दायित्व कालावधीत करावयाच्या पाहणी व दुरुस्तीबाबत उपरोक्त परिच्छेदात नमूद बाबी निविदेमधील कलमांमध्ये अंतर्भूत करण्यात याव्यात.

३. यापूर्वीच्या परिपत्रकातील या संदर्भात देण्यात आलेल्या सर्व सूचना अधिक्रमीत करुन या सुचना प्रसिध्द होण्याच्या दिनांकापासून लागु राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०११४१२३७१७३५१८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Salunke Bapurao Popatrao

Digitally signed by Salunke Bapurao Popatrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Works Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=edca8a98bda16cdd38ff242769798f5e5400f388f00887df293e26ebd101bda6, serialNumber=e7530ea4ce1b9c2035e21cb89b458d475feb6882fc088c831b3e5c624de70c81, cn=Salunke Bapurao Popatrao
Date: 2019.01.14 12:46:58 +05'30'

**( बी.पी. साळुंके )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) सर्व मुख्य अभियंते, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग (विद्युतसह)
२) मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
३) सर्व अधीक्षक अभियंते, सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत/यांत्रिकी)
४) सर्व कार्यकारी अभियंते
५) कार्यासन इमारती २-(निवडनस्ती).